Venutai Chavan College, Karad

Department of Marathi

FYBA Sem- I

Question Bank

# रुजुवात भाग १

१. छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणाला उद्देशून पत्र लिहिले आहे.

**अ) सैन्याधिकारी** ब) प्रधान क) वतनदार ड) सेनापती

२. 'पावखलक' म्हणजे काय?

**अ) पायदळातील सैनिक** ब) घोडेस्वार क) जुमलेदार ड) हवालदार

३. रयतेस कोणास काडीचाही त्रास देऊ नये, अशी ताकीद महाराजांनी कोणास दिली आहे?

**अ) सैन्याला** ब) मोगलांना क) आदिलशहाला ड) किल्लेदारांना

४. 'त्यास मराठियाची तो इज्जत वाचणार नाही, मग रोजगार कैसा? असे महाराजांनी कोणास म्हटले आहे?

अ) किल्लेदार ब) अष्टप्रधान क) रयत **ड) सैनिक**

५. चिपळूणच्या छावणीस लिहिलेल्या पत्रामध्ये कालगणनेच्या कोणत्या सनाचा उल्लेख आहे?

**अ) सुहूर सन** ब) फसली सन क) हिजरी सन ड) यापैकी नाही

६. पांडुरंग चिमणाजी पाटील यांनी कोणते आत्मकथन लिहिले आहे?

अ) दिवस असे होते **ब) माझ्या आठवणी** क) माया आठवणी व अनुभव ड) आठवणी व संस्मरणे

७. जुन्या काळी एखाद्या स्वावलंबी राज्याप्रमाणे स्वतंत्र घटक कोणता होता?

**अ) गाव** ब) वतन क) परगणा ड) सुभा

८. जुन्या काळी सरकारी कामासाठी गावात कोणते वतनदार गावकामगार असत?

अ) देसाई देशपांडे **ब) पाटील व कुळकर्णी** क) मामलेदार-फौजदार ड) कारू-नारू

९. पूर्वी मुलगी सासरी नांदावयास जाताना तिच्याबरोबर काय देण्याची वहिवाट होती?

अ) बटवा ब) दागदागिने क) शिदोरी ड) पैसे

१०. गावाच्या संरक्षणाची सामूहिक जबाबदारी कोण पार पाडत असे?

अ) पोलीस **ब) सोटेवाले** क) तरुण मंडळे ड) देसाई देशपांडे

१०. जनाक्का शिंदे यांचा जन्म कोठे झाला?

अ) पुणे ब) मुंबई क) सोलापूर **ड) जमखंडी**

११. 'शारदा सदन' या संस्थेची स्थापना कोणी होती?

**अ) पंडिता रमाबाई** ब) रमाबाई रानडे क) ताराबाई शिंदे ड) सावित्रीबाई फुले

१२. हिंगणे येथे अनाथ बालिकाश्रमाची स्थापना कोणी केली?

अ) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे **ब) महर्षी धोंडो केशव कर्वे**
क) गोपाळ गणेश आगरकर ड) महात्मा जोतिराव फुले

१३. जनाक्कांना पुणातील कोणत्या शाळेत प्रवेश मिळाला?

अ) शारदा सदन ब) सेवासदन **क) हुजूरपागा** ड) ख्रिस्ती मिशनची शाळा

१४. जनाक्कांच्या शिक्षणासाठी कोणी खूप प्रयत्न केले?

अ) म.फुले **ब) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे** क) न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे ड) रा. ना. चव्हाण

१५. 'जिवंत मराठी' या पाठाचे लेखक कोण आहेत?

अ) वि.रा. शिंदे **ब) वि.द. घाटे** क) पां.चि.पाटील ड) यशवंतराव चव्हाण

१६. वि.द.घाटे यांचा दिवाणखान्यामध्ये सत्कार कोणी केला?

**अ) पाटीलबुवांनी** ब) मित्रांनी क) सहकाऱ्यांनी ड) कुटुंबियांनी

१७. वि.द.घाटे यांच्या मते, पूर्वी खेड्यापाड्यातील शेतकरी कष्टकऱ्यांची मराठी भाषा कशी होती?

अ) कृत्रिम ब) पुस्तकी **क) जिवंत, रसरशीत** ड) प्रमाण

१८. वि.द.घाटे यांच्या मते, भाषेमध्ये आरंभी काय जन्माला येतात!

**अ) क्रियावाचक शब्द, क्रियापदे** ब) विशेषणे क) गाणी ड) गोष्टी

१९. मराठी भाषेवर कोणत्या भाषेचा प्रभाव वाढत चालला आहे?

अ) संस्कृत ब) हिंदी क) कन्नड **ड) इंग्रजी**

२०. पितळेची नळी तोंडात धरून कोण आपल्या कामात गर्क होऊन गेले होते?

**अ) भालू सोनार** ब) गणपत माळी क) विकास सुतार ड) भालबा कुंभार

२१. सोनाराकडून दागिने घेऊन भल्या सकाळी कोणाला जायचे होते?

अ) सोना मावशी **ब) देसायाची आवडाक्का** क) सावाक्का ड) जिजा आत्ती

२२. दाजिबा देसाई कोणत्या धान्याच्या पोत्याची हलवाहलव करीत होते.

अ) मक्याच्या ब) तांदळाच्या क) गव्हाच्या **ड) जोंधळ्याच्या**

२३. 'कोरम भरल्याला हाय; मिटिंग सुरू करा.' असे कोण म्हणाले ?

**अ) सरपंच** ब) बाळा माळी क) तारा मावशी ड) रामा धायगुडे

२४. 'डोळे कधीतरी बोलतात का? कायतरीच त्याचं!' असे उद्गार कोणी काढले आहेत?

**अ) इंदू** ब) प्रभा क) पारू ड) सुंद्रा

२५. इंदू हिला अस्वस्थ करणारे स्वप्न केव्हा पडले होते?

अ) पहाटे ब) दुपारी **क) सायंकाळी** ड) रात्री

२६. ओल्या हाताने इंदूने कशाची काच पुसली?

अ) कंदिलाची ब) खिडकीची क) चष्म्याची **ड) फोटोची**

२७. झाडं डोंगरावर पसरू लागली की वारा त्यांना कशाप्रकारे आकार देतो?

**अ) शिल्पकाराप्रमाणे** ब) कुंभाराप्रमाणे क) चित्रकाराप्रमाणे ड) देवदूताप्रमाणे

२८. मारूती चितमपल्ली यांच्यामते, 'वाढत्या वयाबरोबर माणूस कसा दिसतो?'

अ) सुंदर **ब) कुरूप** क) बेढब ड) हिंस्र

२९. शोला म्हणजे कोणत्या प्रकारचे जंगल होय?

अ) फळांचे ब) फुलांचे **क) सावलीचे** ड) पानझडीचे

३०. उदमांजरीच्या पिलांना कोणत्या नावानं संबोधलं जातं?

अ) कालवं **ब) घबाड** क) डेमका ड) तेलमुंडे

३१. कोणत्या देशामध्ये असाइनमेंटला पुस्तकं देतात?

अ) भारत ब) श्रीलंका क) युरोप **ड) अमेरिका**

३२. सूरज एंगडे यांना मराठी व्यक्तिरिक्त कोणत्या भाषेची आवड आहे?

**अ) इंग्रजी** ब) संस्कृत क) गुजराथी ड) कन्नड

३४. सूरज एंगडे यांनी कोणत्या देशाला जगातला स्वर्ग असे म्हटले आहे?

अ) चीन ब) जपान **क) स्वित्झर्लंड** ड) अफगाणिस्थान

३५. सूरज एंगडे यांनी कोणत्या देशातल्या कामगार चळवळींचा अभ्यास केला आहे?

**अ) आफ्रिका** ब) मॉरिशस क) जिनिव्हा ड) इस्त्राईल

३६. सूरज एंगडे यांना पीएच.डी.करण्याकरिता कोणी प्रोत्साहित केले होते?

अ) थॉमस हॅन्सन ब) डेव्हिड चॅप्लिन क) जॉन कॉमरऑफ **ड) दिलीप मेनन**

३७. भारतात लोकशाही नांदो या शीर्षकाचे भाषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी कधी केले होते

**अ) २५ नोव्हेंबर, १९४९** ब) २६ नोव्हेंबर, १९४९

क) २६ जानेवारी, १९४९ ड) २६ जानेवारी, १९५०

३८. महम्मद बीन कासीमने सिंध प्रांतावर आक्रमण केले, त्यावेळी कोणत्या राजाच्या सैनिक अधिकाऱ्यांनी लाच स्वीकारली?

अ) जयचंद **ब) दहार** क) कैकतेय ड) बिंब

३९. महंमद घोरीला भारतावर आक्रमण करण्याचे निमंत्रण कोणी दिले होते?

अ) सोळंकी ब) अकबर **क) जयचंद** ड) बहादूर शाह जफर

४०. जेव्हा इंग्रज शीख राज्यकर्त्यांचा निःपात करण्याचा प्रयत्न करीत होते, तेव्हा त्यांचा कोणता सेनापती शांत बसला होता?

अ) कर्तार सिंग ब) सुखविंदर क) शेखावत **ड) गुलाब सिंग**

४१. लोकांनी कोणत्या गोष्टीला देशापेक्षा मोठे मानले तर स्वातंत्र्य धोक्यात येईल, असे डॉ. आंबेडकरांना वाटते?

**अ) तत्त्वप्रणाली** ब) स्वतःचा पक्ष क) नेता ड) धर्म

४२. संसदीय कार्यप्रणालीचे सर्व नियम प्राचीन काळी कोणाला माहीत होते?

अ) राजाला **ब) भिक्खू संघ** क) जनतेला ड) मुस्लिमांना

४३. लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला, तरी त्याच्या चरणी अर्पण करता कामा नये, असे कोण म्हणाले होते?

अ) नेपोलियन ब) अब्राहम लिंकन क) डॅनियल ओ कॉनेल **ड) जॉन स्टुअर्ट मिल**

४४. राजकारणातील भक्ती किंवा व्यक्ती पूजा ही अंतिमतः कोठे घेऊन जाते, असे डॉ. आंबेडकर म्हणतात?

**अ) हुकूमशाहीकडे** ब) उज्ज्वल भवितव्याकडे क) द्वेषाकडे ड) प्रगतीकडे

४५. प्रत्येक व्यक्तीला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य, हे तत्त्व कधीपासून लागू होणार होते?

**अ) २६ जानेवारी, १९५०** ब) २५ जानेवारी, १९५०

क) २५ नोव्हेंबर, १९४९ ड) १५ ऑगस्ट, १९४७

४६. हे प्रभू आमच्या राष्ट्राला आशीर्वाद दे, या प्रार्थनेतील कोणता शब्द नंतर बदलण्यात आला?

अ) प्रभू ब) आमच्या क) आशीर्वाद **ड) राष्ट्र**

४७. समाजातील कोणती गोष्ट राष्ट्र विरोधी आहे, असे डॉ. आंबेडकरांना वाटते?

**अ) जाती** ब) पंथ क) पक्ष ड) धर्म

४८. दुभंगलेले घर अधिक काळ पयर्तं टिकू शकत नाही, असे कोण म्हणाले होते?

अ) नेपोलियन ब) जॉन स्टुअर्ट मिल क) डॅनियल ओ कॉनेल **ड) अब्राहम लिंकन**

४९. देवराष्ट्र गावाच्या नैऋत्येस असणारे सर्वात जुने देऊळ कोणत्या देवाचे आहे?

**अ. समुद्रेश्वर** ब. कपिलेश्वर क. माणकेश्वर ड. वेताळेश्वर

५०. समुद्रेश्वर मंदिराला देवराष्ट्रे परिसरातील लोक कोणत्या नावाने ओळखतात?

अ. म्हसोबा **ब. सागरोबा** क. मानकोबा ड. ज्योतिबा

५१. प्राचीन काळातील देवराष्ट्र राज्याची राजधानी कोणती होती?

अ. पलूस ब. देवराष्ट्रे **क. कौंडण्यपूर** ड. रामानंद नगर

५२. जुन्या काळातील कौंडण्यपूर हे गाव आज कोणत्या नावाने ओळखले जाते?

अ. ताकारी ब. तुपारी क. दह्यारी **ड. कुंडल**

५३. सागरेश्वराची खिंड ओलांडून खाली गेल्यावर कोणत्या नदीचे खोरे लागते?

**अ. कृष्णा** ब. कोयना क. पंचगंगा ड. इंद्रायणी

५३. कृष्णा नदी कोठे उगम पावते?

अ. हिमालय **ब. महाबळेश्वर** क. कराड ड. क्षेत्र माहुली

५४. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मगाव आणि आजोळ कोणते?

अ. कराड ब. भाळवणी **क. देवराष्ट्र** ड. कुंडल

५५. लहानपणी यशवंतरावांना कोणाच्या घरी जायला आवडत असे?

अ. मामाच्या ब. मावशीच्या क. आत्याच्या **ड. बाबू तेली**

५६. बाबू तेली कोणता व्यवसाय करीत असत?

**अ. लाकडी घाण्याने तेल गाळणे** ब. शेती क. व्यापार ड. व्यापार

५७. यशवंतरावांना स्वतःचा पुनर्जन्म कुठे झाला असे वाटते?

अ. पंचगंगा **ब. सोनहिरा** क. कृष्णा ड. कुंडल

५७. यशवंतरावांना 'मोठा शिकून मामलेदार हो' असे कोण म्हणाले?

अ. गंगाराम कांबळे ब. आबालाल रहेमान **क. सखाराम म्हस्के** ड. कुंडल

५८. आमचा सोनहिरा कृष्णा कोयनेपेक्षा जबरदस्त आहे हे लक्षात आलं का? असे उद्गार कोणी काढले?

अ. शिक्षकांनी ब. सहकाऱ्यांनी क. वडिलांनी **ड. यशवंतरावांना वाचवणाऱ्या मुलांनी**

५९. 'तपस्वी आबालाल रहिमान' या पाठाचा वाङ्मय प्रकार कोणता आह?

अ) कथा ब) ललित लेख क) निबंध **ड) व्यक्तिचित्र**

६०. करवीर म्हणजे कोणते गाव आहे

**अ) कोल्हापूर** ब) पुणे क) कराड ड) औंध

६१. आबालाल रहिमान किती आकाराच्या कागदावर निसर्ग चित्र रेखाटत होते?

अ) ३० X ५० इंच **ब) ३ X५ इंच** क) १३X १५ इंच ड) ३ X ५ फूट

६२. ''मला फकीराला पैसा घेऊन काय करायचा?'' असे उद्गार कोणी काढले?

अ) गरीब फकीर ब) भिकारी **क) आबालाल रहिमान** ड) माधवराव बागल

६३. आबालाल रहिमान यांच्या पोटापाण्याची कायमची सोय कोणी केली होती?

अ) त्यांच्या वडिलांनी ब) इंग्रजांनी **क) शाहू महाराजांनी** ड) श्रीमंत जहागीरदारांनी

६४. आबालाल रहिमान कोणाच्या बरोबरीचे चित्रकार होते, असे लेखकास वाटते?

**अ) राजा रविवर्मा** ब) गायतोंडे क) पिकासो ड) एम. एफ. हुसेन

६५. आबालाल रहिमान यांचा मृत्यू कधी झाला?

अ) २८ जुलै १९३२ **ब) २८ जून १९३२** क) १८ जून १९३२ ड) १८ जुलै १९३२

६६. 'तपस्वी आबालाल रहिमान' हा लेख प्रथम कोणत्या पुस्तकांमधून प्रकाशित झाला होता?

अ) जीवन प्रवाह ब) माझ्या आवडत्या पाच व्यक्ती

क) कलाविहार **ड) कला आणि कलावंत**

६७. लेखक प्रा. एन. डी. पाटील यांनी 'बाभूळबनातील सोनचाफा' या शब्दांनी कोणाचा गौरव केला आहे?

**अ. गणपतराव देशमुख** ब. विलासराव देशमखु क. गणपत पाटील ड. अनिल देशमुख

६८. १८ मार्च १९९० रोजी राज्यपालांनी हंगामी स्पीकर म्हणून कोणाची निवड केली होती?

अ. रत्नप्पा कुंभार **ब. गणपतराव देशमुख** क. विलासराव देशमुख ड. शरद पवार

६९. आमदार गणपतराव देशमुख कोणत्या मतदारसंघांमधून निवडून आले होते?

अ. जत　　ब. आटपाडी　　**क. सांगोला**　　ड. पंढरपूर

७०. सांगोला हा तालुका महाराष्ट्रातील कोणत्या भूप्रदेशात येतो?

अ. खानदेश　　ब. विदर्भ　　क. मराठवाडा　　**ड. माणदेश**

७१. गणपतराव देशमुख यांचे शिक्षण किती झाले होते?

**अ. बी. ए., एल. एल. बी.**　　ब. बी. ए.　　क. एम. ए.　　ड. बी कॉम. एल. एल. बी.

७२. कोणत्या तलावाच्या प्रश्नात गणपतराव देशमुख यांनी लक्ष घातले होते?

अ. आंधळी　　**ब. बुद्धिहाळ**　　क. येरळवाडी　　ड. राजेवाडी

७३. स्वातंत्र्योत्तर काळातील कोणत्या महत्त्वाच्या आंदोलनामध्ये गणपतरावांनी हिरीरीने भाग घेतला?

अ. एक गाव एक गणपती　　ब. एक गाव एक पाणवठा

**क. संयुक्त महाराष्ट्र चळवळ**　　ड. भूदान चळवळ

७४. राज्यकर्त्यांना मुंबईचे काय करण्याची घाई झाली आहे, असे लेखक म्हणतो?

अ. बीजिंग　　ब. टोकियो　　क. सिंगापूर　　**ड. शांघाय**

७५. 'आय हॅव अ ड्रीम' या मथळ्याखाली शब्दबद्ध केलेले भव्य दिव्य स्वप्न कोणी पाहिले होते?

अ. मार्टिन ल्युथर किंग **ब. जूनियर ल्युथर किंग** क. अब्राहम लिंकन ड. जॉर्ज वॉशिंग्टन

७६. गणपतरावांनी त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात कोणत्या पक्षाच्या माध्यमातून केली?

अ. काँग्रेस　　**ब. शेतकरी कामगार पक्ष**　　क. कम्युनिस्ट पार्टी ड. लाल निशान पक्ष

७७. १९६९ ते १९७५ या काळात गणपतराव देशमुख यांनी महाराष्ट्र राज्य शेतकरी सभेचे कोणते पद भूषविले?

अ. अध्यक्ष　　ब. उपाध्यक्ष　　**क. सरचिटणीस**　　ड. खजिनदार

७८. महाराष्ट्रात अन्नटंचाईचा अतिशय गंभीर स्वरूपाचा प्रश्न उभा ठाकला होता, तेव्हा शेतकरी कामगार पक्षाने कोणती समिती स्थापन केली होती?

अ. भ्रष्टाचार विरोधी कृती समिती　　ब. बेरोजगारी विरोधी कृती समिती

क. दुष्काळ विरोधी कृती समिती　　**ड. उपासमार विरोधी कृती समिती**

७९. उपासमार विरोधी कृती समितीच्या नेत्यांना कोणत्या तुरुंगात बंद करण्यात आले ?

**अ. नाशिक व येरवडा**　　ब. कळंबा　　क. मुंबई　　ड. तिहार

८०. नामदार विलासराव देशमखु यांच्या कारकीर्दीत गणपतराव देशमुख यांनी कोणत्या खात्याच्या मंत्रीपदाची धुरा सांभाळली?

अ. कृषी　　**ब. पणन आणि रोजगार हमी योजना**　　क. सहकार　　ड. मत्स्यपालन

८१. 'शेतीमालाच्या किफायतशीर किमतीची कैफियत' हे पुस्तक कोणी लिहिले आहे?

अ. गणपतराव देशमुख　ब. शरद जोशी　**क. प्रा. एन. डी. पाटील**　　ड. राजू शेट्टी

८२. संत ज्ञानेश्वरांना कोणाच्या भेटीची ओढ लागली आहे.

अ. आई　　**ब. विठ्ठल**　　क. वडील　　ड. देव

८३. ज्ञानेश्वरांनी कावळ्याला काय म्हटले आहे.

**अ. काऊ**　　ब. कावळा　　क. चिमणी　　ड. पोपट

८४. कोणत्या शब्द योजनेतून भ्रमराचा सूचित होतो.

अ. कोकताहे　　ब. नाथा　　**क. रुणुझुणु**　　ड. विठ्ठल

८५. सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतून कोणता आदर्श पाठ आला आहे.

अ. माणुसकीचा　　**ब. प्रबोधनाचा**　　क. तळमळीचा　　ड. तुमचा आमचा

८६. स्त्री सामर्थ्याचा गौरव कोणत्या कवितेतून आला आहे.

अ. कणा　　ब. संसार　　क. आजी　　**ड. राणी छत्रपती ताराबाई**

८७. निसर्गकन्या कोणास म्हटले आहे.

अ. सावित्रीबाई फुले　　ब. मुक्ताबाई　　**क. बहिणाबाई चौधरी**　　ड. जनाबाई

८८. परमेश्वराने माणसाला दिलेली आगाध देणगी कोणती आहे.

**अ. मन**　　ब. तन　　क. धन　　ड. संसार

८९. संसारामध्ये कोणाचा विचार असतो.

अ. स्वतःचा　　**ब. दोन जीवांचा**　　क. पोरा बाळांचा　　ड. संपत्तीचा

९०. भालचंद्र नेमाडे हे मराठीतील ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे कितवे लेखक आहेत.

अ. पहिले　　ब. दुसरे　　क. तिसरे　　**ड. चौथे**

९१. आजी ही कविता म्हणजे काय आहे.

अ. आठवण　　ब. भूतकाळ　　**क. शब्दचित्र**　　ड. आई

## लघुत्तरी प्रश्न

१. चिपळूणच्या छावणीस लिहिलेल्या पत्रामधून छत्रपती शिवाजी महाराजांचे कोणकोणते गुणविशेष दिसून येतात?
२. चिपळूणच्या छावणीस लिहिलेल्या पत्रामधून शिवाजी महाराजांचे प्रजेविषयीचे कोणते धोरण स्पष्ट होते ते लिहा.
३. चिपळूणच्या छावणीस लिहिलेल्या पत्राचे भाषिक विशेष सांगा.
४. 'जुन्या काळी प्रत्येक गाव स्वावलंबी राज्याप्रमाणे एक स्वतंत्र घटक होता', या विधानाचे साधार स्पष्टीकरण करा.
५. जुन्या ग्रामव्यवस्थेमधील पाटील-कुळकर्ण्यांचे स्थान व कार्य विशद करा.
६. जुन्या काळातील गावजत्रांचे व सणावारांचे वर्णन पां. चि. पाटील यांनी कसे केले आहे?
७. पूर्वी खेडेगावात कारू नारू ची व्यवस्था कशी कार्यरत होती, ते लिहा?
८. 'जुन्या महाराष्ट्रातील गावरहाटी'मध्ये स्त्रियांचे जीवन कसे होते ते लिहा.
९. महर्षी शिंदे यांना 'शारदासदन'मध्ये जनाक्कांच्या शैक्षणिक प्रवेशाच्या वेळी कोणता अनुभव आला?
१०. जनाक्का शिंदे यांचा हुजूरपागा शाळेतील प्रवेशाचा अनुभव तुमच्या शब्दात सांगा.
११. वि.द.घाटे यांच्या पाटीलबुवांनी केलेला सत्कार व त्यावरील त्यांचे भाष्य तुमच्या शब्दात लिहा.
१२. वि.द.घाटे यांच्या मते, खेड्यातील जिवंत मराठीचा लोप का व कसा होत आहे?
१३. भाषेची निर्मिती व वाढीसंदर्भात वि.द.घाटे यांनी कोणते मत व्यक्त केले आहे?
१४. वि.द.घाटे यांच्या लेखनशैलीचे विशेष सांगा.
१५. वि.द.घाटे यांचे 'जिवंत मराठी' या पाठातील भाषाविषयक चिंतन तुमच्या शब्दात लिहा.
१६. 'मिटिंग' या कथेतील म्हादू शिपाई या पात्राचे व्यक्तिचित्रण करा.
१७. 'मिटिंग ही विनोदी कथा आहे.' तुमच्या शब्दात स्पष्ट करा.
१८. 'सांज' या कथेतील इंदू या संसारात रमून गेलेल्या स्त्रीचे भावविश्व उलगडून दाखवा.
१९. इंदू या व्यक्तिरेखेच्या मनाच्या अस्वस्थतेची कारणे तुमच्या शब्दात लिहा.
२०. मारूती चितमपल्ली यांना जंगलात कोणकोणते अनुभव आले, ते लिहा.
२१. 'शोला'च्या जंगलाचे वर्णन लेखकाने कशाप्रकारे केले आहे.
२२. सूरज एंगडे यांचा 'नांदेड ते हार्वर्ड' हा शैक्षणिक प्रवास कशाप्रकारे झाला, ते स्पष्ट करा.

२३. सूरज एंगडे यांचा ‘नांदेड ते हार्वर्ड’ हा एक प्रेरणादायी प्रवास आहे, या विधानाची सत्यता पटवा.
२४. संत ज्ञानेश्वराच्या कवितेतील भक्तिभाव स्पष्ट करा.
२५. राणी छत्रपती ताराबाईचे वर्णन सावित्रीबाई फुले यांनी कसे केले आहे.
२६. बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील मनाच्या भावावस्थेचे चित्रण करा.
२७. आजीचे शब्दचित्र भालचंद्र नेमाडे यांनी कसे रेखाटले आहे.

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. शिवाजी महाराजांनी चिपळूणच्या लष्करी छावणीस लिहिलेल्या पत्राचा आशय सांगा.
२. छत्रपती शिवाजी महाराजांनी सैन्याधिकाऱ्यांना कोणता उपदेश केला आहे, ते सविस्तर लिहा.
३. चिपळूणच्या छावणीस लिहिलेल्या पत्राचे वाङ्मयीन विशेष सांगा.
४.‘जुन्या महाराष्ट्रातील गावरहाटी’ या पाठामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण समाजरचनेचे दर्शन कसे घडते, ते लिहा.
५. पां.चि.पाटील यांनी जुन्या महाराष्ट्रातील गावरहाटीची कोणकोणती वैशिष्ट्ये सांगितली आहेत?
६. ‘जुन्या महाराष्ट्रातील गावरहाटी’ या पाठाच्या आधारे ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करा.
७. जनाक्का शिंदे यांनी ‘हूजूरपागा’ या पाठामध्ये कोणकोणत्या आठवणी सांगितल्या आहेत?
८. ‘हुजूरपागा’ या पाठामध्ये तत्कालीन सामाजिक-शैक्षणिक संदर्भ कसे प्रकट झाले आहेत, ते लिहा.
९. वि. द. घाटे यांचे अनुभव व भाषाविषयक विचारांचा परामर्श घ्या.
१०. वि. द. घाटे यांनी मराठी भाषा जिवंत, रसरशीत होण्यासाठी कोणकोणते उपाय सूचविले आहेत, ते लिहा.
११. ‘जिवंत मराठी’ या पाठातील आशय व लेखनशैली विशेष सविस्तर सांगा.
१२. यशवंतराव चव्हाण यांनी देवराष्ट्र गावाची भौगोलिक रचना व तेथील दैवते यांचे वर्णन कसे केले आहे, ते विशद करा.
१३. यशवंतराव चव्हाण यांचे बालपणीच्या सवंगड्यांसोबतचे अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.
१४. यशवंतराव चव्हाण यांच्या लेखनशैलीचे गुणविशेष स्पष्ट करा.
१५. ‘तपस्वी आबालाल रहिमान’ या पाठाच्या आधारे चित्रकार आबालाल रहिमान यांचा परिचय करून द्या.
१६. चित्रकार आबालाल रहिमान यांचे कलंदर व्यक्तिमत्त्व दर्शविणारे दोन प्रसंग तुमच्या शब्दात लिहा.
१७. ‘तपस्वी आबालाल रहिमान’ या पाठाच्या आधारे भाई माधवराव बागल यांच्या लेखन शैलीचे विशेष सांगा.
१८. ‘बाभूळबनातील सोनचाफा’ या लेखामध्ये भाई गणपतराव देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्वाचा कसा परिचय घडविण्यात आला आहे, ते स्पष्ट करा.
१९. गणपतराव देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कोणते गुणविशेष ‘बाभूळबनातील सोनचाफा’ या पाठामध्ये कसे व्यक्त झाले आहेत, ते लिहा.
२०. सामाजिक जाणिवेचे राजकारणी म्हणून भाई गणपतराव देशमुख यांच्या कार्याचा परिचय करून द्या.
२१. संत ज्ञानेश्वरांच्या अभंगातून व्यक्त झालेल्या विठ्ठल भेटीच्या आतुरतेचे वर्णन करा.
२२. सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतून माणुसकीचा महिमा कसा चित्रित झाला आहे ते सांगा.
२३. बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील मनाचे मनोवेधक चित्रण कसे आले आहे ते लिहा.
२४. भालचंद्र नेमाडे यांच्या कवितेतील घरंदाज स्त्रियांच्या वेदना कशा आल्या आहेत ते लिहा.

*****